RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 October, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 October, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : पंधरा | अंक : चौथा | ऑक्टोबर २०१७

प्रभूची भक्ती (सत्संग) 5

प्रश्नोत्तरे 21

निंदा (कथा) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



प्रभूची भक्ती

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू रामदासजी महाराजांची वाणी
अमेरिका – ५ जुलै, १९८०

मन अंतरि हउमै रोगु है भ्रमि भूले मनमुख दुरजना।।

जर आपल्या शरीरास एखादा रोग लागला असेल तर आपण कोणतेही सांसारिक काम करू शकत नाही, मग भले आपण तरुण असो का वयस्क असो. त्याचप्रमाणे जर आपले मन रोगी असले तर आपण शब्द–नामाशी एकरंग होऊ शकत नाही, योग्य रितीने ध्यान–अभ्यास करू शकत नाही. रोगी मन काहीही साध्य करू शकत नाही. आपल्या मनास कामवासना, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार असे रोग लागलेले आहेत.

जेव्हा आपण आपले मन पवित्र करतो, तेव्हाच आपण गुरूंची सेवा करू शकतो. पवित्र मन आपणांस शब्द–नामाच्या कमाईपासून दूर करीत नाही. जेव्हा आपण आपल्या आत्म्यास शब्द–नामाशी जोडतो, नामस्मरण करून अंतर्यात एकाग्र होतो, तेव्हा आपण सूर्य, चंद्र, तारामंडळ पार करून सतगुरूंचे स्वरूप प्रगट करून घेतो. तेथे 'मी–मोठेपणा' समाप्त होतो व 'तूच तू' बाकी रहाते. त्याक्षणी सेवकाची ड्युटी संपते, त्यापुढे सेवकाच्या आत्म्यास सचखंडात घेऊन जाण्याची जबाबदारी गुरूंची असते.

मन एकावेळी दोन कामं करू शकत नाही, ते केवळ एकच काम करू शकते. आपण एकतर शब्द–नामाची कमाई करू शकतो किंवा सांसारिक विषय–भोगांचा रस घेऊ शकतो. कामवासनेमुळे आपला आत्मा अधोगतीला जातो, तो अंतर्यात शब्द–नामाच्या चढाईसाठी सक्षम रहात नाही. जेथे नाम प्रगट होते तेथे काम टिकू शकत नाही. कबीर साहेबांनी कामाची तुलना दिवस आणि रात्र यांच्याशी केलेली आहे. जेथे रात्र असेल तेथे दिवस नसतो तसेच जेथे दिवस असेल तेथे रात्र नसते.

गुरू रामदासजी महाराज सांगतात,''आपल्या अंतरात हे रोग लागलेले आहेत. जर आपण या रोगांना दूर करू इच्छित असाल तर महात्मांच्या संगतीत जा.'' तेव्हा मनात हा प्रश्न उद्‌भवतो की आम्ही महात्मांच्या संगतीत तर रोज जातो, परंतु आमची स्थिती काही बदलली नाही. खरेतर आपली स्थिती दगड आणि पाण्याप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे दगडावर वर्षभर पाऊस पडत राहिला तरी दगडाच्या आत कधी पाणी शिरत नाही. आपली देखील हीच परिस्थिती आहे, आपण सत्संगात जरूर जातो, आपल्या अंतरात तहान देखील असते, सत्संगाविषयी प्रेमही असते, परंतु आपण सत्संगात जे काही ऐकतो त्यावर अंमलबजावणी करीत नाही.

महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की आपण आगीत जितकी जास्त लाकडे घालू तितकीच जास्त आग भडकेल. जर आपण असा विचार केला की आपण आज विषयवासना भोगू आणि उद्या आपणांस त्यापासून शांती लाभेल, तर तसे नाही, तसे केल्याने आपल्या अंतरात विषयवासनेची इच्छा जास्त निर्माण होईल.

नानक रोगु गवाई मिली सतिगुर साधू सजना।।

गुरू रामदासजी महाराज सांगतात,''जर आपण या रोगांना दूर पळवून लावू इच्छित असाल तर संतांच्या उपदेशानुसार वाटचाल करा. जास्तीत जास्त ध्यान–अभ्यास करा व आपले ध्यान तिसऱ्या तिळावर एकाग्र ठेवा.''

मनु तनु रता रंग सिउ गुरमुखि हरि गुणतासु।।

आपण सांगता,''शब्द–नामाची कमाई केल्याने जेव्हा आपण त्रिकुटीपेक्षा पुढल्या मंडळात जाता तेव्हा आपले मन त्रिकुटी ब्रम्हस्थानाच्या शिखरावर जाऊन स्थिरावते. जेव्हा आपण तेथून परत येतो तेव्हा आपले मन परत आपल्या सोबत असते. त्यावेळी आपल्या मनावर नामाचा रंग चढलेला असतो, म्हणून ते आपले सुज्ञ मित्र बनलेले असते.''

जन नानक हरि सरणागती हरि मेले गुर साबासी।।

गुरू रामदासजी महाराज सांगतात,''आम्ही आपल्या गुरूंवर स्वतःचे सर्वस्व बलिदान करतो कारण गुरूंनी आपणांस शब्द–नामाचे दान दिले आणि आम्हांस या रोगांपासून मुक्त केले.''

तू करता पुरखु अगमु है किसु नाली तू वड़ीए।
तुधु जेवडु होई सु आखीए तुधु जेहा तू है पड़ीऐ।।

आता गुरू रामदासजी त्या परमेश्वराचा महिमा वर्णितात,''तू सर्वोच्च आहेस, तूच करता–करविता आहेस. आम्ही तुझी तुलना कोणाशी करू शकू? तू सर्वांचा दाता आहेस, सकलजगाचा बादशहा आहेस, तूच सर्वांचा रक्षणकर्ता आहेस.'' कबीर साहेब सांगतात:

कहत कबीर गूंगे गुड़ खाया, पूछे कहन न जाई हो।

आपण परमात्म्याचे काय वर्णन करू शकतो? जसे एखादा मुका मनुष्य गुळ खाऊन त्याच्या मधुरतेचे वर्णन करू शकत नाही, जास्तीत जास्त तो आपले खांदे हलवून खूषी व्यक्त करून दाखवू शकतो.

महाराज सावन सिंहजी पुष्कळदा रोजा ताजमहालचे उदाहरण देत असत. हिन्दुस्थानात शाहजहाँने रोजा ताजमहाल नामक फार सुरेख इमारत बनविलेली आहे. जर आपण एखादे तुलनात्मक उदाहरण देऊन समजावत असलो की रोजा ताजमहाल कसा आहे, तर त्याप्रकारची इमारत कोणत्याही शहरात अथवा गावात अस्तित्वात नाही. जर एखाद्या दगड–मातीच्या इमारतीचे इतर कोणत्याही दुसऱ्या दगड–मातीच्या इमारतींशी तुलनात्मक उदाहरण दिले जाऊ शकत नाही तर मग आम्ही कसे समजावू शकू की परमात्मा कसा आहे? त्यापेक्षा सर्वात उत्तम हेच ठरेल की तुम्ही आपले ध्यान एकाग्र करून सतगुरूंच्या मदतीने जिवंतपणीच त्या परमात्म्यास भेटावे.

तू घटि घटि इकु वरतदा गुरमुखि परगड़ीए।
तू सचा सभस दा खसमु है सभदू तू चड़ीए।
तू करहि सु सचे होइसी ता काइतु कड़ीए।

आपण सांगता,''तू सर्वांच्या अंतरात वास करतोस, कोणतेही शरीर तुझ्या अस्तित्वाखेरीज नाही. पशू–पक्षी–वृक्ष अशी एकही जागा नाही जिथे तुझे अस्तित्व नाही? परंतु तू गुरूमुखांच्या अंतरात प्रगट असतोस. गुरूमुखांनी सकलजगास संदेश दिला की एक अशी वस्तू आपल्या अंतरात वास करते ज्याच्या अस्तित्वामुळे आपण शोभिवंत आहोत व सर्व आपला आदर करतात. त्याच शक्तीच्या आधारे आपले शरीर हालचाल करू शकते. जेव्हा आपल्या अंतरातून ही शक्ती निघून जाते तेव्हा या शरीराच्या मोबदल्यात कोणी एक कवडी देखील देण्यास तयार नसतो, त्या शरीरास जमीनीत दफन करतात.''

महात्मा आपणांस नेहमी सांगतात की मनमुख आणि गुरूमुख अशा दोन प्रकारची माणसे या जगात येतात. गुरूमुख नेहमी सांगतात की परमात्मा सर्वांच्या अंतरात आहे. गुरूमुखांनी परमात्म्यास अंतर्यात प्रगट केलेले असते. परंतु मनमुख ही गोष्ट मान्य करीत नाहीत. गुरू रामदासजी प्रश्न विचारतात की परमात्म्याने पाच तत्वांचा मनुष्य बनविला. कोणी चार किंवा सहा तत्वांचा मनुष्य बनवून परमात्म्यापुढे उभा करून दाखवावा.

आज जगाने वैद्यकिय उपचारांमध्ये खूप प्रगती केलेली आहे. अनेक रोगांवर डॉक्टर औषधोपचार करतात व कित्येकदा चमत्कारही दाखवतात. परंतु जेव्हा मृत्यु येतो तेव्हा कोणीही त्या आत्म्यास एका सेकंदासाठीदेखील त्या शरीरात थांबवून ठेवू शकत नाही. डॉक्टरास कल्पनाही नसते की आत्मा शरीरातून निघून कुठे गेली, त्याची काय दशा झाली?

मैं मनि तनि प्रेमु पिरंम का अठे पहर लगंनि।
जन नानक किरपा धारि प्रभ सतिगुर सुखि वसंनि।।

आता गुरू रामदासजी सांगतात,''मी त्या परमात्म्यास आपल्या अंतर्यात प्रगट करून घेतले. माझ्या अंतरात चोविस तास त्या परमात्म्यासाठी अतुट प्रेम आहे. ही माझ्यावर सतगुरूंची अपार कृपा झाली त्यांनी दया करून मला परमात्म्याशी जोडले.''

जिन अंदरि प्रीति पिरंम की जिउ बोलनि तिवै सोहंनी।
नानक हरि आपे जाणदा जिनि लाई प्रीति पिरंनि।।

आपण सांगता,''परमात्मा प्रेमरूप आहे. ज्यांच्या अंतरात परमात्मा प्रगट आहे, ते आपल्या अंतरात प्रेम प्रगट करून घेतात. ते जसेही बोलतात, परमात्म्यास ते प्रिय असतात. ज्या परमात्म्याने प्रेम जडविलेले असते, तो स्वत:च जाणतो की हे किती सुज्ञ आहेत.''

भोले पाए मिले रघुराय।

महात्मा आपणांस समजावतात की परमात्मा तीर्थक्षेत्रात स्नान केल्याने मिळत असल्यास मासे व बेडूक जे सदैव पाण्यात रहातात त्यांनी परमात्म्यास प्राप्त केले असते. जर परमात्मा चतुर लोकांना मिळत असता तर भोळे लोकच मागे राहिले असते. जर परमात्मा पैसे खर्च केल्याने मिळत असता तर धनाढ्य सावकार लोकांनी त्यास प्राप्त केले असते. बुल्लेशाहा सांगतात:

बस बस किताबां नूं ठप्प मुल्ला, सानूं इश्क दी गल्ल सुणा कोई।

बुल्लेशाह खूप शिकले–वाचलेले होते. जेव्हा बुल्लेशाहांनी इनायत शाहांकडून कलमा (नाम) प्राप्त केले, तेव्हा ते असे म्हणत असत की,''मी मशीदीतला काजी आहे. मी मशीदीत जाणे सोडू शकत नाही कारण सर्व जग माझी निंदा–नालस्ती करेल की हा मशीदीतला काजी असून मशीद सोडून निघून गेला.'' इनायत शाह त्यास म्हणाले,''मी तुला कलमाशी जोडले आहे. मी असे सांगत नाही की तू आपले रिती–रिवाज सोडून दे. आता तूच विचार कर आणि ठरव की काय करणे योग्य आहे? माझ्या तरफे तू दिवसभर

मशीदीतच बसून रहा.'' जेव्हा बुल्लेशाहांनी आंतरिक कमाई केली तेव्हा त्यांच्या मनातील लोक–लाज नाहीशी झाली. मग जेव्हा ते इनायत शाहांच्या दर्शनासाठी गेले तेव्हा इनायत शाहांनी विचारले की,''काय आता तू मशीदीत जातोस? लोकांना रिती–रिवाज शिकवितोस?'' बुल्लेशाह म्हणाले:

नमाज़ पढ़ा के तें वल देखां मैंनू काबा भुल गयो ई।

हे सतगुरू, मी आता नमाज पडू की तुमच्याकडे पाहू? आता मला तुम्हीच सर्वत्र दिसता आहात. मी मशीदीत जाणे विसरून गेलो आहे.

तू करता आपि अभुलु है भुलण विचि नाही।
तू करहि सु सचे भला है गुरसबदि बुझाही।।

आता गुरू रामदासजी सांगतात, ''हे परमेश्वरा तू अभूल आहेस. तू जीवांना जन्मास घालून कधीही विसरत नाहीस. जगात तुझ्या दयेचा जो वर्षाव होत आहे त्यास केवळ गुरूमुखच जाणतात.''

तू करण कारण समरथु है दूजा को नाही।
तू साहिबु अगमु दइआलु है सभि तुधु धिआही।
सभि जीअ तेरे तू सभस दा तू सभ छडाही।।

आपण सांगता,''तू दयाळू आहेस. तू सर्वांचाच आहेस. जे तुझे ध्यान करतात त्यांस तू सांसारिक बंधनांपासून स्वतंत्र करतोस, त्यांना यमदूतांच्या हवाली जाऊ देत नाहीस. जर यमदूत आत्म्यास बांधूनही उभे असले तरी तू त्यांच्यापासून आत्म्याची सुटका करवितोस. **प्रभूची भक्ती** अमृताप्रमाणे आहे. **प्रभूची भक्ती** सुखदायी असून ती दु:खांचा नाश करते. ती काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकाराची नाशक आहे.''

जे प्रेमाने प्रभूचा शोध घेतात त्यांस प्रभू–परमेश्वर प्राप्त होतो. प्रभूचे प्रिय भक्त प्रभूपेक्षा सवाई असतात. परंतु आपण स्वत:हून प्रभू–परमेश्वरास प्राप्त



करू शकत नाही. आपण प्रभू–परमेश्वरास संत–महात्म्यांच्या संगतीत जाऊनच प्राप्त करू शकतो.

सुणि साजन प्रेम संदेसरा अखी तार लगंनि।
गुरि तुठै सजणु मेलिआ जन नानक सुखि सवंनि।।

आपण सांगता,''**प्रभूची भक्ती** करून आपली दु:खांपासून सुटका होते. जेव्हा आपण गुरूंकडून त्यांचा संदेश ऐकला, तेव्हा आमच्या नेत्रांमधुन अश्रू वाहू लागले की अरेरे, आमची अशा परमात्म्याशी भेट झाली नाही. आता आपल्या जिव्हेवर त्यांचे नाम आले. चोवीस तास आता त्यांच्या नामाचे स्मरण चालू आहे आणि नेत्र प्रेमात भिजून चिंब झाले आहेत. सतगुरूंनी खूप दया करून आपणांस परमात्म्याचा संदेश दिला.''

हजूर सांगत असत,''प्रेमी आत्म्याचे गुरूंकडे येणे हे सुक्या दारुगोळ्याचे आगीच्या संपर्कात येण्यासमान असते. जर दारूगोळा ओला असेल तर त्यास ताप देऊन सुकविणे गरजेचे असते. त्यास सुकविण्यास खूप वेळ लागतो. जेव्हा दारूगोळा सूकून कोरडा होतो तेव्हा तो अग्नीच्या संपर्कात आल्यास लगेच पेट घेतो.''

संतमतात असे होत नाही की एका मनुष्यास नाम घेऊन वीस किंवा पन्नास वर्षे झाली असतील तरच त्याची सूरत चढेल. ते तर प्रेमी–भक्ताच्या धैर्यावर तसेच मेहनतीवर अवलंबून असते. गुरू तर दया करण्यासाठी सदैव तयारच असतात. जे रात्री जागून भजन–अभ्यास करतात, मेहनत करतात तेच कामयाब होतात. कबीर साहेब सांगतात:

सुखिया सब संसार है, खाए और सोए। दुखिया दास कबीर है जागे और रोए।।

सतिगुरु दाता दइआलु है जिस नो दइआ सदा होइ।
सतिगुरु अंदरहु निरवैरु है सभु देखै ब्रहमु इकु सोइ।।

आपण सांगता,''सतगुरू दयावंत बनून या जगात येतात व ते केवळ दयेचा वर्षाव करणेच जाणतात. सतगुरूंचे कोणाशीही वैर नसते. ते अंतरातून निर्वैर असतात.'' तुम्ही इतिहास वाचून पाहू शकता की कशाप्रकारे संसारिक लोकांनी संत–महात्म्यांवर अत्याचार केले, तरीही महात्म्यांनी त्यांना शाप दिला नाही की त्यांचे अनिष्ट चिंतीले नाही.

गुरू अर्जुनदेवजींना तप्त तव्यावर बसविले गेले. जेव्हा त्यांच्या डोक्यावर गरम रेती घालू लागले, तेव्हा आपल्या मियां मीर नामक प्रेमीस हे वर्तमान कळले की लाहोरमध्ये असा कहर केला जात आहे. मियां मीर आपल्याकडे आला व म्हणाला,''गुरूदेव, तुम्ही मला आदेश द्या मी लाहोर शहर जमीनदोस्त करून टाकतो.'' गुरू अर्जुनदेवजी म्हणाले,''हे तर मी देखील करू शकलो असतो. परंतु माझ्यासाठी परमेश्वराच्या मर्जीचा स्वीकार करणे अत्यंत महत्वाचे आहे.'' म्हणून गुरू अर्जुनदेवजी म्हणाले:

तेरा भाणा मीठा लागे नाम पदार्थ नानक मांगे।

मंसूरचे हात कापून टाकले गेले, डोळे काढले गेले. त्यावेळी मंसूनेदेखील हेच म्हटले,''हे परमात्मा, यांच्यावर कृपा कर जेणेकरून त्यांनी मला ओळखावे.''

मोहम्मद साहेबांच्या जीवनचरित्रात नमूद केलेले आहे की त्यांना मक्का येथून गावाबाहेर काढले, ते मदीना येथे जाऊ लागले असता तेथील लोक घाणीने भरलेल्या टोपल्या घेऊन रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे राहिले आणि मोहम्मद साहेबांच्या डोक्यावर ती घाण घालू लागले. मोहम्मद साहेब त्याबद्दल वाईट न मानता म्हणाले की,''हे अल्ला ताला! यांना माफ कर.''

मोहम्मद साहेब तेथून पुढे एका गुहेत जाऊन आपला ध्यान–अभ्यास करू लागले. जे लोक मोहम्मद साहेबांचे विरोधी होते त्यांनी मोहम्मद साहेबांना पकडले आणि आपल्या पाषाण हृदयाच्या प्रभावापोटी त्यांना मारून फेकून दिले. त्यांच्या हृदयात जरादेखील करूणा आली नाही. मग त्यांच्या मनात विचार आला की कदाचित ते केवळ मूर्च्छीत तर झाले

नसावेत! खात्री करून घेण्यासाठी त्यांनी मोहम्मद साहेबांचे दात काढले की ते पुन्हा जिवंत होऊ नयेत? जेव्हा ते मोहम्मद साहेबांचे दात काढू लागले तेव्हा मोहम्मद साहेब म्हणाले,''हे अल्ला ताला! यांना माफ कर.''

तेच खरे गुरूमुख आहेत ज्यांना परमात्माने दया करून त्रैलोक्याचे राज्य जरी दिले, तरी त्यांना त्या राज्यप्राप्तीमुळे आनंद होत नाही किंवा परमात्म्याने ते राज्य काढून घेतले तरी त्यांना काडीमात्र खिन्नता होत नाही.

निरवैरा नालि जि वैरु चलाइदे तिन विचहु तिसटिआ न कोई।

आपण सांगता,''गुरू निर्वैर असतात, दयावान असतात. ते सदैव दया करतात. जर कोणी निर्वैर व्यक्तीशी वैर केले तर त्यास कधीही सुख प्राप्त होत नाही. असा व्यक्ती अंतरातून रिक्त व पोकळ असतो.''

सतिगुरु सभना दा भला मनाइदा तिस दा बुरा किउ होई।
सतिगुर नो जेहा को इछदा तेहा फलु पाए कोइ।
नानक करता सभु किछु जाणदा जिदू किछु गुझा न होई।
जिस नो साहिबु वडा करे सोई वड जाणी।
जिसु साहिब भावै तिसु बखसि लए सो साहिब मनि भाणी।।

आता आपण सांगता,''सतगुरू सर्वांचे हितचिंतक असतात. भले जगाने त्यांच्याविषयी कितीही अनिष्ट आणि अपायकारक चिंतीले तरी परमात्मा त्यांच्या पाठीशीच असतो, तो त्यांचे कधी वाईट होऊ देत नाही. परमात्मा गुरूमुख आणि मनमुख दोघांनाही पहात असतो. परमात्म्यापासून काहीही लपलेले नाही. ज्याचे जसे कर्म असते, त्यास अनुसरून परमात्मा त्याची परतफेड करून घेतो.

कोणीही परमात्म्याची फसवणूक करू शकत नाही. जर आपण कोणावर आरोप केला किंवा कोणाविषयी अनिष्टचिंतन केले की आम्ही सांगितले तर

परमात्मा कदाचित याचा मार्ग बंद करून टाकेल, तर तसे होऊ शकत नाही. परमात्मा सर्वांना पहात असतो. गुरू–परमात्म्याचे कोणाशीही वैर नसते, म्हणून जो ज्याप्रकारची कर्मं करतो, त्याचे फलित त्यास जरूर मिळते. जो ज्या भावनेने गुरूंना पाहतो, गुरूंची सेवा करतो, त्यास तसे फळ जरूर मिळते.'' महात्मा आपणांस हेच समजावतात:

दोख पराया देखके चलत हँसत हँसत।
आपदा कबहूँ न देखया जिसका आद न अंत।।

परमात्मा ज्याव्यक्तीस महान बनवितो केवळ तोच महान असतो. परमात्मा ज्यावर दया करतो त्यासच दया प्राप्त होते, जगात केवळ तोच पुजनिय असतो.

जे को ओस दी रीस करे सो मूड़ अजाणी।

आपण सांगता,''ज्याने **प्रभूची भक्ती** करून प्रभू–परमेश्वरास अंतर्यात प्रगट केले असेल त्याची जर कोणी बरोबरी करीत असेल की याची पूजा होत आहे, यास लोक महात्मा मानत आहेत, तर मग मला का मानत नाहीत? तर असा व्यक्ती भ्रमात आहे, मूर्ख आहे, अज्ञानी आहे.''

जिस नो सतिगुर मेले सु गुण रवै गुण आखि वखाणी।
नानक सचा सचु है बुझि सचि समाणी।।

आपण सांगता,''ज्याच्यावर गुरू दया करतात, केवळ तोच अंतर्यात परमात्म्यास भेटू शकतो. गुरूंवर कोणाचीही जबरदस्ती अथवा बळप्रयोग चालू शकत नाही, त्यांच्यावर हुकूम गाजवू शकत नाही की केवळ हुकूमाच्या आधारे आपण ती वस्तू प्राप्त करू शकू.''

हरि सति निरंजन अमरु है निरवैरु निरंकारु।
जिन जपिआ इक मनि इक चिति तिन लथा हउमै भारु।।

गुरू रामदासजी सांगतात,''परमात्मा सत्य असून तो मायारहित आहे. ज्यांनी प्रभूचा जप केला, **प्रभूची भक्ती** केली, ते प्रभूच्या घरी पोहचले. अशा व्यक्तींच्या डोक्यावरील मी–मोठेपणा व अहंकाराचा भार नाहीसा होतो, त्यांच्या अंतरात केवळ परमात्माच–परमात्मा रहातो.'' संत–महात्मा परमात्म्याचे सह–भागीदार नसतात, ते परमात्म्याचे प्रिय पुत्र असतात. प्रिय पुत्र आपल्या वडिलांकडून हवे ते मागून घेऊ शकतो.

जिन गुरमखी हरि आराधिआ तिन संत जना जैकारु।
कोई निंदा करे पूरे सतिगुरु की तिस नो फिटु फिटु कहै सभु संसारु।।

गुरु साहेब सांगतात,''ज्यांनी सतगुरूंच्या शिकवणुकीनुसार आपले जीवन ढाळले, शब्द–नामाची कमाई केली, गुरूंच्या आज्ञेचे पालन केले, आम्ही त्यास वंदन करतो. जो अशा महात्म्यांची निंदा करतो, श्रोतक शिष्य त्यास जाहीरपणे 'फिटे मुँह' (निंद्य मुख) म्हणून त्याची मानखंडना करतात.''

सतिगुर विचि आपि वरतदा हरि आपे रखणहारु।

आपण सांगता, सतगुरूंच्या अंतरात परमात्मा कार्यरत असतो. परमात्मा सतगुरूंच्या अंतर्यात प्रगट असून तो स्वत: त्यांचे रक्षण करीत असतो. सतगुरू परमात्म्यास सदैव हेच सांगत असतात की,''राहिली तर तुझीच आणि गेली तरी तुझीच.''

धनु धनु गुरु गुण गावदा तिस नो सदा सदा नमसकारु।
जन नानक तिन कउ वारिआ जिन जपिआ सिरजणहारु।।

आपण सांगता,''माझे गुरूदेव अमरदेव आहेत, ते धन्य आहेत. त्यांनी शब्द–नामाची कमाई केली, आम्ही त्यांस वंदन करतो.''

आपे धरती साजीअनु आपे आकासु।
विचि आपे जंत उपाइअनु मुखि आपे देइ गिरासु।।

गुरू रामदासजी सांगतात,''त्या परमात्म्याने स्वत:च धरती बनविली, स्वत:च आकाश बनविले आणि स्वत:च संसाराची रचना केली. तो स्वत:च आपल्या मुखात अन्नाचा घास भरवितो.''

मी नेहमी सांगत असतो की जेव्हा परमात्म्याचा अंश आत्मा आपल्या शरीरातून निघून जातो त्यावेळी आपले शरीर हालचाल करणे बंद करते, ना आपले हात काम करतात, ना आपली जिभ बोलू शकते आणि ना आपले नेत्र पाहू शकतात. महात्मा परमात्म्याची दया आणि शक्ती सर्वत्र कार्यरत असलेली पहात असतात. जर परमात्म्याने आपल्या शरीरात त्याची शक्ती ठेवली तरच आपण आपल्या हाताने अन्नाचा घास तोंडात घालू शकतो.''

सभु आपे आपि वरतदा आपे ही गुणतासु।
जन नानक नामु धिआइ तू सभि किलविख कटे तासु।।

आपण सांगता, ''परमात्मा सर्वांच्या अंतरात वास करतो. परमात्मा स्वत:च गुरु बनून आपणांस सांगतो की शब्द नामाची कमाई केल्यानेच आपली पापं नष्ट होऊ शकतात.'' कबीर साहेब सांगतात:

जब ही नाम हृदय धरयो भयो पाप का नाश।
मानो चिंगी आग की पड़ी पुरानी घास।।

सहजोबाई सांगतात:

पहले बुरा कमाएके बांधी बिख की पोट।
कोट कर्म छिन में कटे जब आए गुरु की ओट।।

तू सचा साहिबु सचु है सचु सचे भावै।
जो तुधु सचु सलाहदे तिन जम कंकरु नेड़ि न आवै।।
तिन के मुख दरि उजले जिन हरि हिरदै सचा भावै।
कूड़िआर पिछाहा सटीअनि कूड़ु हिरदै कपटु महा दुखु पावै।
मुह काले कूड़िआरिआ कूड़िआर कूड़ो होइ जावै।।

आपण सांगता, ''हे परमात्मा तू सच्चा आहेस, अजरामर आहेस, अविनाशी आहेस, तुझा कधी अंत होऊ शकत नाही. जे तुझी भक्ती करतात, तुझे गुणवर्णन करतात, तुझ्याशी सदैव जुडलेले असतात, यम कधीही त्यांच्या जवळ फिरकत नाही. ज्यांनी कधीही भक्ती केली नाही, ध्यान–अभ्यास केला नाही, जे लोकांसमोर व्यासपिठावर बसून खोटे बोलतात की आम्ही भक्त आहोत, या! आम्ही तुम्हाला या भवसागरा पार घेऊन जाऊ शकतो, अशा लोकांना परमात्मा उकिरड्यावरील कचरा बनवून रिक्त करतो. कारण परमात्म्याची फसवणूक केली जाऊ शकत नाही.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

चूहा खड्ड न मावी तिक्कल बद्दा छज।

अशी अवस्था त्या लोकांची होते ज्यांच्याकडून स्वत:चे ओझे उचलले जात नाही, ते सर्व जगास सांगतात की तुम्हीदेखील आमच्या मागोमाग या, आम्ही तुमची जबाबदारी घेऊ. आजपर्यंत कोणीही परमात्म्याची फसवणूक करू शकला नाही व कोणी करूही शकणार नाही. गुरू साहेब सांगतात:

हंसा देख तरंदया बग्गा आया चाव।
डुब मुए बग बपड़े सिर तल उपर पाँव।।

इथे संतांना हंस म्हणून संबोधले गेले आहे. हंसाची भरारी खूप दूरवरची असते. बगळा जास्त दूरवर उडू शकत नाही. हंसाला पाहून बगळ्याच्या मनात इच्छा उत्पन्न झाली की मी देखील उंच भरारी मारावी. जेव्हा बगळा दूरवर भरारी मारण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा तो लवकर खाली पडला, त्याचे शिर खाली आणि पाय वरती झाले.

रीसां करे तनाड़ियां जो साहिब दर खड़ियां।

ज्यांनी बसून कधी शब्द–नामाची कमाई केली नाही, ध्यान–अभ्यास केला नाही, त्यांनी शब्द–नामाची कमाई केलेल्या महात्म्यांची नक्कल केली तर त्यांचीदेखील त्या बगळ्याप्रमाणे केविलवाणी अवस्था होईल.

तुम्ही कोणत्याही महात्म्यांचा इतिहास वाचून पहा. गुरू नानकदेवजी परमसंत होते. त्यांनी अकरा वर्षे कठोर तपश्चर्या केली, सुखसोयी त्यागून कंकर-दगडांचा बिछान्यावर निजले, खूप मेहनतीने ध्यान-अभ्यास केला. गुरू अमरदेवजी महाराजांनी आपल्या सतगुरूंची अतोनात सेवा केली. ते रात्रभर जागून ध्यान-अभ्यास करीत असत. जेव्हा कधी झोप येत असे तेव्हा ते आपले केस खीळ्यास बांधून ध्यान-अभ्यास करीत असत. आजही तो खीळा तेथे पहावयास मिळतो.

हुजूर स्वामीजी महाराजांनी सतरा वर्षे एका अंधाऱ्या खोलीत बसून ध्यान-अभ्यास केला. बाबा जयमल सिंहजींनी देखील खूप ध्यान-अभ्यास केला, कठोर मेहनत केली. जेव्हा त्यांना भूक लागत असे तेव्हा ते काही दिवसांपूर्वी बनवून ठेवलेल्या भाकऱ्या पाण्यात भिजवून खात असत.

बाबा जयमल सिंहजींचा एक नामधारी कित्येकदा माझ्याकडे येत असे, त्याचे नाव देखील जयमल सिंह होते. त्याचे वय साधारण शंभर वर्षापेक्षा जास्त होते. तो सांगत असे की बाबा जयमल सिंहजींनी त्यांच्याकडे एक वेताची छडी ठेवलेली होती. जेव्हा झोप जास्त त्रस्त करीत असे तेव्हा ते स्वत:स त्या वेताच्या छडीने मारून घेत असत.

महाराज सावन सिंहजींनी देखील खूप ध्यान केले, नाम-कमाई केली. त्यांनी एक बैरागन ('Y' आकाराची काठी) ठेवलेली होती. जेव्हा ध्यानाला बसले असता झोप येऊ लागल्यास ते त्याआधारे उभे राहून ध्यान-अभ्यास करीत असत. ते दोन-दोन, तीन-तीन दिवस आतून बाहेर येतच नसत.

बरेचसे असे प्रेमी अजुनही जीवंत आहेत जे महाराज कृपाल सिंहजींसोबत राहीले आहेत, त्यांना माहित आहे की महाराज कृपालजींनी कशाप्रकारे नाम कमाई केली, आपल्या गुरूंच्या आज्ञेचे पालन केले. मला अनेक माणसे भेटून सांगतात की ज्यांना नामाची कमाई पहावयाची असेल त्यांनी दिल्लीला जावे, महाराज कृपाल सिंहजी खूप नामाची कमाई केलेले संत आहेत.

त्याचप्रमाणे बाबा बिशनदासजींकडे दोन शब्दांचे नाम होते. द्वितीय स्थान गाठणे देखील स्वत:चे समर्पण करण्यातुल्य आहे. त्यांनी एक तराजूचे पारडे ठेवलेले होते, ज्याच्या आत खीळे लावलेले होते. जर झोप जास्त त्रस्त करू लागल्यास ते त्या पारड्यात जाऊन बसत असत.

मी आपल्या जीवनातील बराचसा काळ जगापासून दूर जमीनीखाली बसून व्यतीत केलेला आहे. मला माहीत आहे की ध्यान–अभ्यास किती मेहनतीने केला जातो. मी अनेकदा आर्मीचे उदाहरण देऊन समजावत असतो की जेव्हा दुसरे विश्व–महायुद्ध चालू होते व हिटलर हल्ला करीत पुढे सरत होता त्यावेळी आपल्या देशातील लोक वीस वर्षे कैदेत रहाणे मंजूर करीत असत परंतु सैन्यात भरती होण्यासाठी तयार होत नसत. त्यावेळी मी लढाईला जाण्यासाठी स्वत:चे नाव नोंदविले. माझे वय फार लहान होते परंतु माझ्या हृदयात खूप शूरता आणि साहस होते. सर्व मला पहात असत की हा लहानसा मुलगा किती साहसी आहे. काही दिवसांनी आम्ही लढाईच्या आघाडीवर जाणार होतो म्हणून डॉक्टरांनी आमची तपासणी केली. डॉक्टरने आमच्या कमांडरला विचारले,''मी कोणाकोणाच्या वाट्याला दूध पीणे लिहून देऊ?'' कमांडरचे डोळे भरून आले, ते म्हणाले,''सर्वच बळीचे बकरे आहेत, तुम्ही सर्वांसाठीच दूध पीणे लिहून द्या.'' त्यावेळी मला खूप स्वाभिमान वाटत होता की मी लढाईसाठी चाललो आहे. तुलसी साहेब सांगतात:

तुलसी रण में जूझना घड़ी एक का काम।
नित उठ मन से जूझना बिन खंडे संग्राम।।

कबीर साहेब सांगतात:

हँस हँस पिया न पाया जिन पाया तिन रोए।
हाँस खेड़े पिया मिले ते कौन दुहागन होए।।

आपल्याला साहस केले पाहिजे, मेहनत केली पाहिजे. मेहनत आणि परिश्रम करण्यापासून कधीही आळस करू नये.

***

प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान

एक प्रेमी : *स्वत:च्या जीवनामध्ये शाकाहाराचे अवलंबन करीत असलेल्या पालकांनी, त्यांच्या मुलांनी देखील शाकाहारी असावे, यासाठी जबरदस्ती करणे कितपत योग्य आहे? त्यांच्या मुलांची जर मांसाहार करण्याची इच्छा असेल तर पालकांनी त्यांच्याशी कसे वागावे? तसेच नामधारी नसलेले मुल आजारी असेल व डॉक्टरांनी त्यास मांसाहार ग्रहण करण्याचा सल्ला दिल्यास त्याच्या पालकांनी काय करावे?*

बाबाजी : मुले भोळे–निष्पाप आत्मा असतात. त्यांच्यावर जबरदस्ती करण्याची गरज नसते, त्यांना समजावून सांगणे गरजेचे असते. शरीरासाठी आवश्यक असलेल्या प्रोटीन्स, विटामिन्सचा जेवढा पुरवठा शाकाहारी भोजनातून होतो, तेवढा तो मांसाहारी भोजनातून होत नाही. आजकाल तर डॉक्टर स्वत:च शाकाहाराचे फायदे समजवून सांगतात. खरेतर आई–वडील स्वत:च मुलांना समजावण्याचा प्रयत्न करीत नाहीत, त्यासाठी थोडाफार वेळ काढून त्याचे ज्ञान मुलांना देत नाहीत. मुले निष्पाप असतात, ती या संसारमंडळावर नुकतीच आलेली असल्याने त्यांना शाकाराहाबद्दल ज्ञान नसते. पालकांनी थोडेसे श्रम घेऊन प्रयत्नपूर्वक मुलांना याबद्दलची माहिती द्यावी कारण मुलांना जीवनाचा सन्मार्ग त्यांनीच दाखवायचा असतो.

आई–वडीलांचे हे परमकर्तव्यच असते की त्यांनी मुलांना विविध पैलूंनी समजावून सांगावे की, बाळा! शाकाहारी भोजन सर्वोत्तम आहार आहे. या तत्वावर सत्संगी आई–वडील जर ठाम असतील तर मी खात्रीने सांगतो की सतगुरूंची शक्ती त्यांना खूप मदत करते. सतगुरूंच्या हृदयात आपल्याप्रती असलेली करुणा व सहानुभूती आपल्या लक्षात येत नाही. सतगुरू शक्ती

अतिशय महान आहे. कधीकधी सतगुरू मुलांना स्वप्नात येऊन किंवा प्रत्यक्षात वा अप्रत्यक्षपणे सांगतात की, खबरदार जर मांस खाशील तर! ते तुझ्या खाण्यायोग्य नाही.

आमच्या प्रांतात महाराज सावन सिंहजींचा एक नामधारी राहत होता. त्याच्या मुलास कुणीतरी मांस खाण्यास दिले. त्या रात्री महाराज सावन सिंहजींनी मांस खाऊ घालणाऱ्याचा गळा घोटला, तसेच त्या मुलाच्या तोंडाजवळ मांसाचा तुकडा ठेवून त्यास चिमटा काढला, तेव्हा तो मुलगा वेदनेने ओरडू लागला व म्हणून लागला की, मी पुन्हा मांस खाणार नाही. ज्या मनुष्याने त्या मुलास मांस खायला दिले होते, तो मनुष्य सर्व सत्संगीं समोर माफी मागू लागला की मी पुन्हा असे करणार नाही. माहीत नाही आज रात्रीदेखील माझ्याबरोबर काही तरी अघटीत घडेल.

सत्संगी आणि त्याच्या मुलांची सतगुरूंना खूप काळजी असते. सत्संगींनी दृढप्रतिज्ञ व दृढनिश्चयी असणे आवश्यक असते. सत्संगीचा सतगुरूंवर दृढविश्वास असेल आणि तो स्वत: ध्यान–अभ्यास, नामस्मरण करीत असेल तर सतगुरूदेखील बेफिकीर रहात नाहीत. ते अहोरात्र आपल्या मदतीसाठी तयार असतात.

एक प्रेमी : *जेव्हा सेवकाचे एखादे काम सतगुरू करतात, तेव्हा ते सेवकास असे का म्हणतात की, हे काम माझ्या सतगुरूंनी केले. भलेही ते काम त्यांनी स्वत: शारिरीक सतगुरूंनी केलेले असो, ते त्या कामाचे श्रेय त्यांच्या आंतरिक सतगुरूंनाच देतात. परंतु जेव्हा ते त्यांच्या सेवकाकरवी सेवा करवितात, त्या सेवकाच्या अंतरामध्ये स्वत: बसून सेवा करतात, तेव्हा मात्र सेवकास मान देतात की ही सेवा तू केलेली आहेस. असे का?*

बाबाजी : डॉक्टर मेलिनो यांनी काल देखील सुरेख प्रश्न विचारला होता, आजही खूप गहन प्रश्न विचारला आहे. परमपिता कृपालजींच्या कृपेने या प्रश्नाचे उत्तर देण्याचा मी प्रयत्न करतो.

एके काळी मुस्लीम समाजाने सांसारिक प्रेम आणि पारमार्थिक प्रेम हे एकसमान आहे असा समज करून घेतला. परमार्थी प्रेम प्राप्त करण्यासाठी सांसारिक प्रेम करणे गरजेचे असते व त्यासाठी सांसारिक प्रेम एखाद्या पुलाप्रमाणे कार्य करते अशी त्यांची धारणा होती. खरे प्रेम विषय-विकार रहीत असते, ते पवित्र असते.

हिंदू पुराणांमध्ये राधा आणि कृष्णाच्या प्रेमकथा आढळतात. खरेतर कृष्णास बऱ्याच राण्या होत्या, परंतु कृष्णाचे राधेवर अधिक प्रेम होते. एके दिवशी प्रेमामध्ये गुंग होऊन राधा स्वत:चे अस्तित्वच विसरली आणि तिने तिच्या मैत्रिणींना विचारले, ''तू राधेस कुठे पाहिले आहेस काय?'' मैत्रिणींनी तिला विचारले, ''मग तू कोण आहेस?'' त्यावर राधिका उत्तरली, ''मी तर कृष्ण आहे.'' जो खरा प्रेमी असतो, मग तो सांसारिक प्रेमी असो वा पारमार्थिक, तो स्वत:चे अस्तित्व विसरून जातो. तो स्वत:चे अस्तित्व नष्ट करून त्याच्या प्रिय व्यक्तीमध्ये सामावून जातो. मी-मी म्हणणे सोडून तो 'तूच तू' असे म्हणू लागतो.

याचप्रमाणे हीर-रांझाचे प्रेमदेखील प्रसिद्ध होते. परंतु ज्या प्रेमाचा उल्लेख मी करीत आहे, ते प्रेम खरे व पवित्र होते. ते प्रेमीजन या जगातील विषय-विकारांचा मळ आणि भोग-वासनेच्या आहारी गेलेले नव्हते. सुफी संत बुल्लेशाह यांनी त्यांच्या लिखाणामध्ये हीर-रांझाच्या प्रेमाचे वर्णन करीत म्हटले आहे की, हीर जेव्हा रांझाच्या प्रेमामध्ये लीन झाली, तेव्हा ती स्वत्वच विसरून गेली. हीरने तिच्या मैत्रिणींना विचारले, ''तुम्ही कोठे हीरल पाहिले का?'' तेव्हा मैत्रिणी म्हणाल्या, ''तू कोण आहेस?'' हीर म्हणाली, ''मी तर रांझा आहे.'' मैत्रिणी म्हणाल्या, ''तू हीर आहेस.'' तेव्हा हीर म्हणाली, ''नाही, मी रांझा आहे.'' अखेरीस बुल्लेशाह म्हणतात:

रांझा-रांझा करदी नी मैं, आपे रांझा होई।
सद्दो नी मैनूँ धीदो रांझा, हीर ना आखो कोई।

हे जग विषय–विकारांमध्ये लडबडलेले आहे. हीर–रांझाच्या प्रेमाबद्दल सर्वच जण बोलतात, परंतु त्यांच्या समान बनणे खूपच अवघड आहे. मी झंग येथील स्त्रियांना भेटलो आहे. त्यांनी शरीर चादरीने गुंडाळलेले होते. सामान्यत: हिंदुस्थानी स्त्रिया सलवारचा वापर करतात. मी त्या स्त्रियांना विचारले की तुम्ही चादरी का गुंडाळल्या आहेत? त्यांनी उत्तर दिले की सलवारची नाडी बांधणे ही इंद्रियदमन केलेल्या कुमारिकेचे चिन्ह आहे, परंतु आमच्यापैकी केवळ हीरच अशी इंद्रियदमन केलेली पवित्र कुमारी होती. एखादी हीरसारखी पवित्र स्त्री असेल तरच सलवार घालून नाडी बांधू शकेल. आम्ही तिची बरोबरी करू शकत नाही.

हे मी मुस्लीम समाजातील प्रेमाबद्दल सांगितले आहे की त्या स्त्री–पुरुषाच्या जोडीने जंगलामध्ये वास्तव्य करीत असतानाही त्यांचे जीवन पवित्र राखले. वैवाहिक आयुष्य न जगताही ते भोग–वासनेच्या पलिकडे गेले. स्वत:स विसरून ते एकमेकांच्या स्वरूपामध्ये एकरूप झाले. परंतु अशी स्थिती प्राप्त करूनही या प्रेमामुळे अध्यात्मिक प्रगती होत नाही. एकाने जेव्हा दुसऱ्याची साथ सोडली तेव्हा त्यांना जाणीव झाली की ही देखील एक प्रकारची फसवणूकच आहे. याचसाठी संत–महात्म्यांनी त्यांच्या लेखणीमध्ये स्त्री–पुरुषाच्या प्रेमाचा संदर्भ केला. ते स्वत: गुरूस्वरूपी परमात्म्याची पत्नी बनले व परमात्म्यास आपला खरा पती असे संबोधित केले.

गुरू आणि शिष्याचे प्रेम खरे आणि पवित्र असते. सतगुरू पवित्र भांडे आहेत. जो कुणी अशा पवित्र व्यक्तीवर प्रेम करतो, तो स्वत:ही पवित्र बनतो. गुरू अंगददेवजींचे गुरू नानकदेवजींवर खरे प्रेम जडले. साक्षात् परमात्मा ज्या देहामध्ये वास करीत कार्यरत असतो, त्या देहाबद्दल इतरांना आपोआपच आपुलकी वाटू लागते. आपण सांगत आहात:

मैं देख देख न रज्ञा गुरु सतगुरु देहा।

कबीर साहेब सांगतात:

झाती दिलबर वाली बाजो तन नू जाणें मुर्दा।

खऱ्या प्रेमीच्या अंतकरणामध्ये असलेला विरहदेखील खराच असतो. सतगुरूंकडे कसलीही मागणी न करता, ते त्यांच्यासमोर एखाद्या पुतळ्यासमान उभे राहून नजारा पाहत राहतात. क्षणोक्षणी निरनिराळे नजारे त्यांच्या नजरेस पडत असतात. महाराज कृपाल जेव्हा येथे येत असत, त्या काळी हे मोकळे मैदान होते. आपण आता बसलेलो आहोत, त्या जागेवर तेव्हा मोसंबींचा मळा होता. तुम्ही जेव्हा जमीनीखालची गुहा पाहाल, तेव्हा तुम्हाला तेथे लाकडाची बैठक दिसेल. त्या बैठकीच्या जवळ अगोदर एक झरोका होता. हुजूर जेव्हा माघारी जात, तेव्हा मी म्हणत असे:

चिक झरोके पास खड़ोके दूरों यार तकें दा।
ये भी जाण गनीमत दिल नू लख लख शुक्र करेंदा।।

हे वाक्य मी कायम अंत:करणामध्ये आठवत असतो की मी त्या झरोक्याजवळ उभे राहून माझ्या प्रिय कृपालांकडे पाहत असे. त्यावेळी मी माझ्या अंत:करणामध्ये आभार व्यक्त करीत असे की मी धन्य आहे, मला त्यांची जाणारी गाडी दूरपर्यंत दिसत आहे. माझ्या कुटुंबातील माणसे, माझ्या आणि माझ्या सतगुरूंच्या दरम्यान भिंत बांधण्याचा प्रयत्न करीत असत. परंतु नेत्रांमधून अश्रू ढाळत मी म्हणत असे की, माझ्या अंत:करणावर माझ्या प्रियकराचा ताबा आहे. त्यातून सुटका करून घेणे, माझ्यासाठी अशक्य आहे. मला याचीदेखील कल्पना आहे की, ज्याप्रमाणे त्यांनी माझ्यावर ताबा मिळविला आहे, तसाच ताबा मी त्यांच्यावरही मिळविलेला आहे. आता त्यांची माझ्यापासून सुटका होऊ शकणार नाही. त्यामुळे आमच्या दोघांच्यामध्ये तुमचे काय काम आहे?

कबीर साहेबांचे जेव्हा त्यांच्या सतगुरूंवर प्रेम जडले, तेव्हा त्यांना इतर काहीच दिसत नसे. स्वत:च्या शरीरामध्ये त्यांनी डोकावून पाहिले असता, त्यांना सर्वत्र केवळ सतगुरूच दिसत होते. तेव्हा ते म्हणाले, ''माझ्या



नेत्रांमध्ये तुम्ही आल्यास, मी नेत्रस मिटून घेईन. ना मी इतर कुणाला पाहिन आणि ना तुम्हांस इतर कुणाला पाहू देईन. तुम्ही माझे होऊन जाल आणि मी तुमचा होऊन जाईन. आपण अशा एखाद्या ठिकाणी वास्तव्यास जाऊ, जेथे आपणांस पाहणारा कुणी नसेल, ना कुणी आपल्या प्रेमा आड येईल.''

या संदर्भामध्ये महाराज सावन सिंहजी एक गोष्ट सांगत असत. एक मुसलमान फकीर अंतर्यामध्ये गेला, तेव्हा त्याने म्हटले, ''मन खुदायम, मन खुदायम, मीच खुदा आहे.'' त्या फकीराच्या सेवकाने फकीरास विचारले की तुम्हीच म्हणत होतात की,''मनुष्य खुदा नाही, खुदा देहस्वरूपामध्ये येत नाही. परंतु आज आपण म्हणत आहात की, मी खुदा आहे.'' फकीर म्हणाला, ''असे मी म्हटलेच नव्हते, इतर कुणीतरी बोलले असेल.''

एके दिवशी पुन्हा त्या फकीराचे लक्ष अंतर्यामध्ये जुडले गेले असता, त्याने पुन्हा तेच वाक्य म्हटले. अंतर्यामध्ये जेव्हा खुदाचे साम्राज्य होते, तेव्हा मनुष्य स्वत:स विसरून जातो. त्याच्या देहावरचा स्वत:चा ताबा जातो व तो देह सतगुरू स्वत:च्या ताब्यात घेतात.

सर्व संत जेव्हा स्वत्वास विसरून सतगुरूंमध्ये एकरूप झाले, तेव्हा त्यांना सर्वत्र सतगुरूच दिसू लागले, त्यांना स्वत:च्या अस्तित्वाचा विसर पडला. अशा स्थितीत सतगुरूच त्यांचे सर्वस्व बनून जातात. स्वत:स ते सतगुरूंच्या हातातील कठपुतळी समजतात. ज्या प्रदेशामध्ये सतगुरू वास करीत असतात, त्या प्रदेशाची भाषा मी आणि तू अशी नसते. तेथे केवळ 'तूच तू' ही भाषा आहे. कबीर साहेब सांगतात:

तू तू करता तू हुआ मुझमें रही न हूं। जब आपा परका मिट गया जित देखां तित तूं।।

जेव्हा आपणांस स्वत:च्या अस्तित्वाचाच विसर पडतो, तेव्हा जेथे पाहू तेथे गुरूच गुरू दृष्टीस पडतात. ती मनमोहक मूर्ती नजरेत सामावते. अशा अवस्थेत मनुष्य कसे बरे म्हणू शकतो की हे काम गुरूंनी नाही, मी करीत आहे? त्याचा मी पणा नाहीसा होतो व सतगुरूंचे साम्राज्य तेथे पसरते.

सेवकासाठी सतगुरू सोन्याचे अंडे देणाऱ्या कोंबडीप्रमाणे असतात. तुम्ही विचार करा! कुणी जर एखाद्यास दोन पैसे दिले, तर तो किती आनंदी होतो? सतगुरूंनी सोन्याची अंडी देऊन जर कुणास धनवान केले, तर तो त्याच्या सतगुरूंचे गुणगान करणार नाही का? तो कसे बरे म्हणेल की मीच कर्ता आहे? सतगुरूच सावकार असून, सर्व काही गुरूच गुरू आहेत.

गुरू अर्जुनदेवजी जेव्हा आपल्या सतगुरूंच्या प्रेमाचे भूकेलेले बनून गेले, स्वत:स विसरून गेले, तेव्हा त्यांनी म्हटले की, मी माझ्या नेत्रांनी सतगुरूंचे दर्शन घेतले असून माझा जन्म धन्य झाला आहे.

गुरू आणि शिष्याचे असे प्रेम अतिशय कमी लोकांच्या भाग्यात असते. अतिशय थोडेच शिष्य स्वत:च्या आयुष्यात यशस्वी बनतात. नाहीतर बाकी सर्व शिष्य सतगुरूंच्या डोक्यावर ओझे बनून राहतात. सर्वांचे ओझे उचलून सतगुरू आपणांस त्यांच्या घरी नेतात. अंत:करणामध्ये खरे प्रेम निर्माण झाल्यास, त्यामध्येच सर्व ध्यान–अभ्यास व नामस्मरण येते.

आपण म्हणतो खरे की, प्रेम करणे काय अवघड आहे? ज्यांनी प्रेम केले, त्यांना याबद्दल विचारा! त्यांना आपल्या व परक्यांमध्ये एकच प्रियकर दिसू लागतो. हृदयामधील गोंधळ नष्ट होतो आणि सर्वांच्या अंतर्यामध्ये सतगुरूच बसलेले दिसतात. महात्मा सांगतात:

जैसा कम ईश्क है कुरदा ऐसा नहीं कटार सखे।
जख्म ईश्क दे रोज लगदे ईक वार तलवार करे।
नन्हीं जान आशिकां वाली ईश्क तां मारो मार करे।
खाना रज न खांदे आशिक निन्द नाल न प्यार करे।
दिल अंदर तस्वीर यार दी मुँह थी नाम पुकार करे।
मंत्र जंत्र चलदा नाहीं कोई दवा न कार करे।
यही दवा समझो ओहदी नजर मेहर दी यार करे।
चतुरदास ओह पूरा आशिक जो अंदरों दीदार करे।।

हे वर्णन खऱ्या प्रेमींचे आहे, जे स्वत:चे अस्तित्व विसरून सतगुरूंचे बनतात. सतगुरू त्यांच्या तन, मन आणि धनाचा ताबा घेतात.

प्रश्नाचा दुसरा भाग असा आहे की सतगुरू सेवकास मान का देतात? प्रियजनहो! सेवक मन-इंद्रियांचा गुलाम आहे. मनाचा दास आहे. मनासमोर तो मुडदा बनून बसलेला आहे. मुडद्यास अंघोळ घालणाऱ्याने त्यास सरळ धरावे वा उलटे धरावे, त्यास राख लावावी व साबण; मुडदा कोणतीही तक्रार करीत नाही. अशीच अवस्था आपणा संसारी प्रेमींची आहे. मनासमोर आपण मुडदा बनून बसलेलो आहोत. त्यामुळे आपणांस विषय-विकारांमध्ये गुंतवावे की गुरू प्रेमामध्ये गुंतवावे ही मनाची मर्जी असते. तसेच आपणांस सत्संगामध्ये न्यावे की इतरत्र न्यावे ही सर्व मनाची मर्जी असते.

मला महाराज सावन आणि कृपाल या दोन महान हस्तींच्या चरणी बसण्याची संधी लाभली. काही लोकांनी महाराज कृपालजींच्या विरुद्ध बराच पत्रव्यवहार केला, परंतु महाराज कृपालजींनी महाराज सावनजींकडे कधीही म्हटले नाही की, लोकं माझी तक्रार करीत आहेत. ते शांत राहीले. एके दिवशी तसा विषय निघाला असता, महाराज सावन म्हणाले की, जे लोकं पत्रे लिहित आहे, त्यांच्या स्वत:च्याच अंतरात ते दोष आहेत. जी लोकं इतरांवर दोष-आरोप करतात, खरेतर ते दोष त्या लोकांमध्ये येतात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की आपण जर इतरांना नग्न करण्याचा प्रयत्न केला तर निसर्गाच्या नियमानुसार निसर्गच आपणांस नग्न करून टाकतो. खरा प्रेमी तोच असतो, ज्यास एखाद्यामध्ये दोष दिसला, तर त्या दोषावर पडदा टाकतो. ही शक्ती केवळ सतगुरूंमध्ये असते. त्यामुळे ते सेवकास सन्मान देतात, जेणेकरून सेवकाला त्याच्या अंत:करणामध्ये लाज वाटावी की, माझ्यामध्ये एवढे अवगुण असूनही सतगुरू मला चांगले म्हणतात. अनेकदा सेवकास मिळालेल्या शाबासकी नंतर तो स्वत:चे अवगुण त्यागून पवित्र जीवन जगू लागतो.

माझा एक मित्र त्याच्या आईशी भांडून मद्यपान करू लागला. एकदा त्याने त्याच्या नोकराद्वारे आईला निरोप पाठविला की तो मद्यपान करीत असून आईला जे काही करायचे असेल, ते तिने करावे. त्याची आई काय करू शकत होती? बाहेरगावी गेलेले त्याचे वडील योगायोगाने घरी आले. मुलाला मद्यपान करीत असलेले पाहून वडिलांनी न पाहिल्यासारखे केले, जेणेकरून त्यांनी त्यास मद्यपान करीत असताना पाहिले आहे असे मुलाच्या लक्षात येऊ नये. त्या मुलाला स्वत:चीच लाज वाटू लागली, माझे वडील किती सज्जन आहेत की त्यांनी मला मद्यप्राशन करीत असताना पाहूनही काही विचारले नाही. त्यानंतर त्याने मद्यप्राशन करणे सोडून दिले.

अनेकदा संत आपणांस सन्मान देतात, कारण आपण मन–इंद्रियांचे गुलाम आहोत. संतांना कल्पना असते की वाममार्गी पडलेल्या प्रेमींना मी उचलून सन्मार्गी आणले नाही, तर हे कसे सुधारतील? आपण विचार करतो! सतगुरूंना पत्र लिहून कळवले तरच त्यांना एखादी गोष्ट समजेल. आपण जर सांगितले नाही तर कदाचित त्यांना कळणारही नाही. अशी लोकं संतमतामधून काय प्राप्त करणार?

आपले सतगुरू अंतर्ज्ञानी आहेत. आपण विचार नंतर करतो, त्या पूर्वीच ते ऐकतात. ते शाबासकी यासाठी देतात की, जेणेकरून हे वेडे, मुर्ख जीव कोणत्या ना कोणत्या प्रकारे समजावे, त्यांना कोणत्या–ना–कोणत्या मार्गाने प्रेम मिळावे, माझे प्रेम प्राप्त झाल्यावरच ते स्वत:चे अवगुण विसरतील. आपल्या सतगुरूंना सर्व माहीत असते, तरीही ते सेवकाच्या मुखातून ऐकल्या नंतर त्यास समजावतात की, तू असे न करता अशा प्रकारे काम कर.

***

निंदा

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींना सांगितलेली एक कथा
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान



एक महात्मा, राजा अजासुराकडे लंगरकरीता दान मागण्यासाठी गेले. राजाने त्या महात्म्यास जवळच पडलेली घोड्याची लीद (विष्ठा) उचलून दिली. आपण जे काही दान म्हणून देतो, ते दहा पटीने वाढत जाते अशी परंपरा आहे. त्या महात्मांनी दान म्हणून मिळालेली लीद आपल्या झोपडीजवळ ठेवून दिली. ती लीद वाढत-वाढत तिचे रूपांतर एका मोठ्या ढिगाऱ्यात झाले.

राजा अजासुर एकदा तेथून जात होता. त्याने झोपडीकडे पाहत विचार केला की या महात्म्यांकडे घोडा व घोडी नसतानाही एवढी लीद कोठून जमा झाली असेल? तसे त्याने महात्म्यास विचारले असता, महात्म्यांनी त्यास उत्तर दिले, ''हे माझ्या एका प्रेमीने दिलेले दान आहे, जे दिवसेंदिवस वाढत आहे.'' तेव्हा राजाच्या लक्षात आले की हे कर्म माझ्याकडूनच झालेले आहे. राजा महात्म्यास म्हणाला, ''मला आपण माफ करा, माझ्याकडून खूप मोठी चूक झाली आहे.''

महात्मा म्हणाले, ''राजा! ही लीद तर खाल्ल्यानंतरच संपेल. ती देखील तुलाच खावी लागणार आहे.'' ते ऐकून राजास खूप दु:ख झाले. त्याने महात्म्यापुढे प्रार्थना केली, ''यावर काहीतरी उपाय सांगा.'' महात्मा



म्हणाले, ''यावर एक युक्ती अशी आहे की लोकांनी तुझी निंदा करावी, जेणेकरून ती लोकं ही लीद खातील. मग तुझ्यासाठी काही उरणार नाही.''

राजाने विचार केला की माझी निंदा कोण करणार? अखेरीस तो त्याच्या महालात परतला व एका कुमारी कन्येस बळजबरीने महालामध्ये बोलावून घेतले. आता लोकं निंदा करू लागले की राजातर प्रजेच्या पित्यासमान असतो. परंतु दुर्दैवाने त्यानेच दुष्कर्म करण्यासाठी महालामध्ये मुलीस बळजबरीने नेले आहे. परंतु अंतरातून राजा निर्मळ व पवित्र होता. तो त्या मुलीची पूजा, मान-सन्मान करीत होता. लोकं राजाची निंदा करीत राहिले व ती जमा झालेली लीद त्यांच्या वाट्यास येऊ लागली.

मात्र त्या राज्यातील एका सुताराने मात्र राजाची निंदा केली नाही. राजा पुन्हा महात्म्याकडे गेला व त्याने विचारले, ''काही लीद बाकी उरली आहे काय?'' राजाने जितकी लीद महात्म्यांस दान केली होती केवळ तितकीच लीद बाकी राहिली होती. महात्मा म्हणाले, ''हे राजा! तुझ्या राज्यामध्ये एक सुतार आहे, ज्याने तुझी निंदा केलेली नाही. त्याने जर तुझी निंदा केली, तर उरलेली लीददेखील संपून जाईल.''

आतापर्यंत राजाला खूप चिंता लागली होती. रात्री वेषांतर करून राजा त्या सुताराच्या घरी गेला व त्यास म्हणाला,''अगोदर आपला राजा अतिशय सज्जन होता. परंतु आता बघ किती दुष्कर्म करीत आहे?'' सुताराने हातात एक छडी घेतली आणि राजास म्हणाला, ''तू ही छडी पाहिलीस का?''

ते पाहून राजा अजासुर तेथून बाहेर पडला. महात्म्याजवळ येऊन राजा म्हणाला तो सुतार काही निंदा करण्यास राजी नाही. तेव्हा महात्मा म्हणाले, ''आता मात्र तूच ही उरलेली लीद खाऊन संपवून टाक.'' राजाने त्यानुसार केले. गुरू नानकसाहेब सांगतात:

अजासुर रोवे भिखिया खाये, ऐसी दरगाह मिले सजाये।

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ३ जानेवारी २०१८ पासून रविवार दि. ७ जानेवारी २०१८** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व गुरूप्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी २ जानेवारी २०१८ रोजी सायंकाळी किंवा ३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी खालील पत्त्यावर पोहोचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा ७ जानेवारी २०१८** रोजी साजरा केला जाईल.

भूराभाई आरोग्य भवन,
शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,
कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७
फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२-२४९६५०००

सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

३ ते ५ नोव्हेंबर २०१७
१ ते ३ डिसेंबर २०१७